दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १२१ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.३ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## आजपासून राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात

# महाविकास आघाडीचा चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार,पत्रकार परिषद घेत साधला निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्याचा अर्थसंकल्प आजपासून सुरू होणार आहे. तसेच अधिवेशनापूर्वी सत्ताधाऱ्यांकडून चहापानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमावर विरिधकांनी बहिष्कार टाकण्यात आला आहे. महाविकास आघाडीची आज पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेत चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड, ठाकरे गटाचे अंबादास दानवे आणि आदित्य ठाकरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना अंबादास दानवे म्हणाले, वाल्मीक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात आहे. काही जिल्ह्यांमध्ये दारूबंदी आहे, गडचिरोली जिल्ह्यात, वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असताना देखील दारूबंदीबाबत सात हजार गुन्हे दाखल झाले आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. मालाडमध्ये, बदलापूरमध्ये, अमरावतीमध्ये घटना घडल्या. या सगळ्या घटनांवर सरकार गंभीर नसल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे.पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यामधील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही पकडला जात नाही, ही घटना नऊ डिसेंबरला झाली आहे. आज दोन मार्च उगवलेला आहे. तीन महिने झाले असतानाही हा आरोपी पकडला जात नाही. या गावाचे दुर्दैव असे की या गावातील लोकांना उपोषणाचा निर्णय घ्यावा लागतो. हे सर्व घडत असताना कोरटकर नावाची मस्ती आलेली व्यक्ती ही कोणाशी संबंधित आहे? असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला.अंबादास दानवे म्हणाले, इंद्रजित सावंत यांच्यासारख्या इतिहास संशोधकाला धमकी देते. आणि दुसरीकडे प्रशांत कोरटकरांना सरकार संरक्षण देते. म्हणजे हे सरकार कोणत्या दिशेने चालले आहे, आतापर्यंत त्यांना अटक करायला पाहिजे होती. कृषी विभागात मोठा घोटाळा झाला आहे, आरोग्य विभागाचे जे टेंडर निघाले होते त्याला स्थगिती देण्यात आली आहे. एसटीचे जे तेराशे दहा बसेसचे टेंडर निघाले होते, त्यालाही स्थगिती देण्यात आली आहे.दरम्यान, यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार व युवसेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी देखील महायुती सरकारवर टीका केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, आज ते सत्तेत आहेत उद्या आम्ही सत्तेत येऊ. आम्हाला पद नव्हे तर राज्याचे हित महत्त्वाचे आहे, असे यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.



# ‘त्या’ ५४ गावांना सिंचन सुविधा द्या आमदार राजेश विटेकर यांची मागणी

**पुणे (वृत्तसंस्था)**

रपरभणी व मानवत तालुक्यातील ५४ गावे पिण्याचे पाणी आणि सिंचन सुविधांपासून वंचित असल्याने, या गावांना तातडीने सिंचन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी केली.पुणे येथे माजलगाव कालवा सल्लागार समितीची बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत पाथरी विधानसभा मतदारसंघातील सिंचनाच्या विविध मुद्द्यांवर आमदार विटेकर यांनी लक्ष वेधले.

जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत माजलगाव उजवा कालवा (किमी ५० ते १०१) मधील लहान व लघु कालव्यांचे अस्तरीकरण न झाल्याने शेवटपर्यंत पाणी पोहोचत नाही. परिणामी सिंचन पूर्ण क्षमतेने होत नसल्याने, या कालव्यांचे अस्तरीकरण हाती घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

पैठण डाव्या कालव्याच्या जुन्या वितरण व्यवस्थेमुळे शेवटपर्यंत पाणी पोहोचत नाही. मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पिके या कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असल्याने, मुख्य कालव्याची आणि वितरण व्यवस्थेची तात्काळ दुरुस्ती करावी, अशीही मागणी त्यांनी केली.मुख्य अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास छत्रपती संभाजीनगर यांनी पाणी उपलब्धतेबाबत सर्वेक्षणाचे आदेश दिले होते, त्यानुसार माजलगाव कालवा विभागाने सकारात्मक अहवाल सादर केला आहे. त्यामुळे प्रस्ताव मंजूर करून आगामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी, अशी अपेक्षा विटेकर यांनी व्यक्त केली.५० वर्षे जुन्या जायकवाडी प्रकल्पाची वितरण प्रणाली हालाखीच्या स्थितीत असल्याने, त्याच्या दुरुस्तीचे काम प्राधान्याने पहिल्या टप्प्यात हाती घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली.याशिवाय, कोथळा (ता. मानवत) आणि कुंभारी (ता. परभणी) येथे बॅरेजेसच्या सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन मुख्यमंत्री १०० दिवसांच्या कार्यक्रमात समाविष्ट करावे, अशी मागणी त्यांनी बैठकीत केली.बैठकीस आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांचीही उपस्थिती होती.



# राज्यातून तुला उध्वस्त केल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही!

## शिवसेना नेते रामदास कदम यांचें उध्दव ठाकरेंना जाहीर आव्हान

**मुंबई । विराम पवार**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी पुन्हा एकदा ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. या महाराष्ट्रातून उद्धव ठाकरेंना उद्धवस्त केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही असं वक्तव्य रामदास कदम यांनी केलं. तर राज्यातून उद्धवस्त केल्याशिवाय रामदास कदम नाव सांगणार नाही, असं म्हणत रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंना थेट इशारा दिला आहे.



हा इशारा देत असताना उद्धव ठाकरे यांनी योगेश कदम यांना संपवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोपही रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर केला. दरम्यान, रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या आरोपांवर आणि टीकेवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्याकडून पलटवार करण्यात आला आहे. एक दिवस तुम्हाला पुन्हा मातोश्रीच्या दारात यावं लागेल, असा दावा संजय राऊत यांनी केलाय. ‘उद्धव ठाकरेंना उद्धवस्त करण्याचं त्यांच्या आयुष्यातील जर ते ध्येय असेल तर करूद्या.तुमचं हे फडफडणं तात्पुरतं आहे. सत्ता आहे तोपर्यंत तुमचं फडफडणं आहे. पण एकदिवस तुम्हाला पुन्हा मातोश्रीच्या दारात यावं लागेल हे माझं भाकित नसून माझा दावा आहे. असं वक्तव्य संजय राऊत यांनी करत रामदास कदमांवर निशाणा साधलाय

# महायुती सरकारला त्यांच्याच मंत्र्यांनी आरसा दाखवला-विजय वडेट्टीवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्याची ही बातमी महाराष्ट्रातील वास्तव असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. तसेच महायुती सरकारला त्यांच्याच मंत्र्यांनी आरसा दाखवला आहे. आता तरी मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांना जाग येणार का? असा सवालही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.



मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी येथील जत्रेत रक्षा खडसे यांच्या मुलीची काही टवाळखोरांकडून छेड काढण्यात आली होती. यावेळी टवाळखोरांकडून त्यांचे व्हिडिओ देखील काढण्यात आले. या संशयावरून त्यांनी या तरुणाच्या हातामधील मोबाईल घेऊन त्याची पडताळणी केली. या घटनेचा राग येऊन चारही टवाळखोरांनी सुरक्षा रक्षकासोबत झटापट केली. याप्रकरणी रक्षा खडसे यांनी मुक्ताईनगर पोलिस ठाण्यात जाऊन तरुणांना अटक करण्याची मागणी केली आहे.

पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्याची ही बातमी महाराष्ट्रातील वास्तव आहे. पोलिस सुरक्षा असताना केंद्रीय मंत्र्यांच्या मुली आज महाराष्ट्रात सुखरूप नाही तिथे शेतात, नोकरीवर जाणाऱ्या सामान्य आई वडिलांच्या मुली दररोज स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी काय ‘स्ट्रगल’ करत असतील आणि किती मानसिक त्रास त्यांना सहन करावा लागत असेल हा अंदाज महायुतीतील मंत्र्यांना नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.आरोपींना पकडण्यासाठी मंत्र्यांना थेट पोलिस स्टेशन गाठावे लागले. आम्ही कधीपासून सांगत आहोत राज्यात पोलिसांचा धाक राहिला नाही कारण गुंडाना महायुतीचे राजकीय संरक्षण मिळते, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. लाडक्या बहीण म्हणून मिरवणाऱ्या महायुती सरकारला त्यांच्याच केंद्रीय मंत्र्यांनी आरसा दाखवला आहे. आता तरी मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री जागे होणार आहेत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला.राज्याच्या विविध भागातील महिला अत्याचारांच्या घटनांमुळे महाराष्ट्र आता महिला मुलींसाठी सुरक्षित राहिला नाही हे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलींची टवाळखोरांनी छेड काढली, त्यांच्या सुरक्षारक्षकांना धक्काबुक्की केली. आरोपींना अटक होत नाही म्हणून खडसे यांना पोलीस स्टेशनला जाऊन ठिय्या द्यावा लागतो, हे महाराष्ट्रात जंगलराज आल्याचे निदर्शक आहे. राज्यातील महिला अत्याचारांच्या घटनांमुळे राज्याची मान शरमेने खाली गेली असून महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्था राखण्यात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. त्यांनी तात्काळ गृहमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

# धनंजय मुंडेंचा बीड प्रकरणात संबंध नाही:पण आरोपी जवळचा होता

## नीतिमत्तेच्या आधारावर त्यांनी राजीनामा द्यायला पाहिजे-रामदास आठवले

**नाशिक (वृत्तसंस्था)**

मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची सध्या चर्चा सुरू आहे. अंजली दमानिया यांनी देखील धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी सोमवारपर्यंत अल्टीमेटम दिला आहे.



सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनाम न घेतल्या पेटून उठू, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला. तर करुणा मुंडे यांनी तर ३ मार्च रोजी धनंजय मुंडेंचा राजीनामा होईल, असा दावाच केला. यावर केंद्रीय मंत्री यांनी प्रतिक्रिया दिली. मस्साजोगचे संतोष देशमुख हत्या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारे राजीनामा द्यायला पाहिजे, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचेही आठवले म्हणाले. ते नाशिक येथे माध्यमांशी बोलत होते.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख् हत्या प्रकरणी सीआयडीने १५०० पेक्षा जास्त पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हाच या हत्येमागचा मास्टरमाइंड असल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे. वाल्मीक कराडला मुख्य सुत्रधार म्हटल्याने धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी राजीनाम द्याव अशी मागणी जोर धरत आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. महायुतीच्याही काही नेत्यांकडूनही धनंजय मुंडेंचा राजीमाना घ्यावा, अशी मागणी होत आहे. यामुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत राजकीय दबाव वाढत आहे.करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे काय संबंध आहेत हे सगळ्यांना माहिती आहे. करुणा मुंडे यांना माहिती मिळाली असेल तर मला त्याबद्दल माहिती नाही. एक गोष्ट खरी आहे की, वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून संतोष देशमुखचा मर्डर केल्याची सगळी माहिती सीआयडीला मिळाली, असे रामदास आठवले म्हणाले.मला असे वाटते की, धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा मोठ्या प्रमाणात जवळचा संबंध होता. पण, या कोणाशी काही संबंध नसेल असे काय पुरावेही नाही. परंतु धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा ही मागणी आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक आहे. खुनाच्या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांचा कसलाही संबंध नाही. पण, खुनातील आरोपी जवळचा होता. नीतिमत्तेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे, अशी मागणी रामदास आठवले यांनी केली.

## मुख्याध्यापकानेच लीक केला दहावी इंग्रजी विषयाचा पेपर

# भंडाऱ्यातील बारव्हा चिचाळ येथील प्रकार,तिघांवर गुन्हा दाखल

**भंडारा (वृत्तसंस्था)**

लाखांदूर तालुक्यातील चिचाळ/बारव्हा येथील महात्मा फुले विद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर दहावीच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे फोटो व्हॉट्सअ‍ॅपवर प्रसारित करून संगनमताने गैरप्रकार केल्याप्रकरणी मुख्याध्यापकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार शनिवारी (दि. १) मार्चला दरम्यान घडला. जिल्ह्यात परीक्षा कॉपी मुक्त वातावरणात पार पडत असताना या प्रकारामुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी दिघोरी पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा नोंदविला. शनिवारी सकाळी १०.४५ ते ११.३० वाजताच्या दरम्यान चिचाळ-बारव्हा येथील महात्मा फुले विद्यालय येथे दहावीच्या इंग्रजी विषयाची परीक्षा सुरू असताना काही संशयास्पद हालचाली आढळल्या. मुख्याध्यापक विशाल फुले, सहायक शिक्षक दीपक मेश्राम, मयूर टेंभरे यांनी संगनमत करून प्रश्नपत्रिकेचा फोटो काढून तो व्हॉट्सअ‍ॅपवर प्रसारित केल्याचे उघडकीस आले. ही बाब गट शिक्षण अधिकारी अंबादे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी ठाण्यात तक्रार दाखल केली.शिक्षण विभाग आणि पोलिसांना यावर्षीच्या परीक्षेदरम्यान पेपरफुटी होण्याची शक्यता असल्याची माहिती आधीच मिळाली होती. त्यामुळे भरारी पथक आणि गुप्तचर यंत्रणा सतर्क होती. तपासादरम्यान, मुख्याध्यापक फुले आणि सहायक शिक्षक मेश्राम यांनी संगनमत करून इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेचा फोटो काढला आणि तो मयूर टेंभरे याच्या मोबाइलवर पाठवला. या मोबाइल क्रमांकाचा तपास केला असता, संदेश मोठ्या प्रमाणावर व्हॉट्सअ‍ॅपवर फॉरवर्ड केल्याचे आढळून आले. संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यामध्ये आणखी कुणाचा सहभाग आहे का? याचा शोध घेतला जात आहे. या गैरप्रकारात आणखी काही शिक्षक, विद्यार्थी किवा बाहेरच्या व्यक्ती सामील आहेत का? याचा तपास सुरू असून काही मोबाइल नंबर आणि सोशल मीडिया ग्रुप स्कॅन केले जात आहेत. प्रामाणिक विद्यार्थी मेहनत करून परीक्षा देत असताना काही व्यक्ती अशा प्रकारचे गैरप्रकार करतात.तक्रारीच्या आधारे दिघोरी पोलिस ठाण्यात शिक्षण विभागाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शिक्षण विभागातर्फे संविधत परीक्षा केंद्रावर तसेच केंद्र संचालक, पर्यवेक्षकांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.



# लघुलेखक संवर्गातील पदे भरा; मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना खा.नीलेश लंके यांचे निवेदन

### विद्यार्थ्यांमध्ये उदासिनता

मागील दोन वर्षांपासून अनेक विद्याथ या पदाच्या परीक्षेचा सराव करत आहेत. मात्र जाहिरात प्रसिध्द होत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये उदासिनता निर्माण झालेली आहे. विद्यार्थ्यांचे वाढते वय, कुटूंबाची जबाबदारी व बेरोजगारी या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या मनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. विद्यार्थी वर्गात नैराश्याचे वातावरण निर्माण होत आहे. जाहिरात प्रसिध्द करून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याची आग्रही मागणी खा. लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**पारनेर । सुयश नरसाळे**

महसूल विभागातील अनेक जिल्हाधिकारी कार्यालये व विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये लघुलेखक संवर्गातील अनेक पदे मोठया प्रमाणावर रिक्त झालेली असून ही पदे तात्काळ भरण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आपल्या निवेदनात खा. लंके म्हणतात, अनेक ठिकाणी लघुलेखकाऐवजी कामकाजासाठी अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांनी तिथे नेमणूक करण्यात येत आहे. त्यामुळे लघुलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. लघुलेखक या पदाची कौशल्य आर्हता अन्य कर्मचाऱ्यांपेक्षा भिन्न आहे. असे असतानादेखील लघुलेखनाचे कौशल्य अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांकडे नसताना देखील त्यांना लघुलेखन पदाचा कार्यभार दिला जात आहे. एकीकडे राज्यभरात अनेक बेरोजगार युवक-युवती लघुलेखन क्षेत्रात नोकरीची संधी शोधत आहेत. तसेच काही पात्र लघुलेखक पुढील पदोन्नतीची वाट पाहत आहेत.



### कामकाजात सुलभता येईल

लघुलेखक विद्यार्थी व विद्याथनींच्या मागणीचा विचार करून शासकीय कामकाजात सुलभता येईल व बेरोजगार युवक-युवतींना शासन सेवेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये रिक्त झालेली लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक, उच्च श्रेणी लघुलेखक व स्वीय सहाय्यकांची रिक्त झालेली पदे सरळसेवेने, पदोन्नतीने तात्काळ भरण्याबाबत नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याची मागणी खा. लंके यांनी केली आहे.

### लोकसेवा आयोगाची जाहिरात प्रसिध्द करा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दर तीन वर्षांनी मंत्रालयीन विभाग श्रेणीय कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक पदाकरिता जाहिरात प्रसिध्द केली जाते. या पदांसाठी सन २०१८ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. पुढील जाहिरात २०२१ मध्ये येणे अपेक्षित होते. मात्र कोव्हीडच्या प्रभावामुळे ही जाहिरात २०२२ मध्ये प्रसिध्द करण्यात आली. या पदासाठी २०२५ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्याची मागणी खा.लंके यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## नेवरे येथे लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सव सोहळ्याचे आयोजन



**माळशिरस । प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील नेवरे येथे श्री श्रीराम मंदिर, जुनी चावडी येथे संत एकनाथ कृत भावार्थ रामायण पारायणांतर्गत लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सव सोहळा २२ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून हजारो रामभक्त, वाचक, सूचक आणि भाविक सहभागी होणार आहेत. सायंकाळी ४:०० वाजता ग्रंथ मिरवणूक, तर सायंकाळी ६:०० वाजता लक्ष्मणशक्तीचा ग्रंथ वाचन सोहळा होणार आहे. तसेच, २३ मार्च रोजी सकाळी ६:०० वाजता आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ९ मार्च रोजी नेवरे येथून वनवासी मंडळी १४ दिवसांच्या वनवासासाठी प्रयाण करणार असून, त्या दिवशी गावातून टाळ-मृदंगाच्या गजरात ग्रंथाची शोभायात्रा काढण्यात येणार आहे.या सोहळ्यासाठी सर्व रामभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रामायण पारायण मंडळ व नेवरे ग्रामस्थांनी केले आहे.

## धानोरे येथे महाकुंभ अमृत कलश पूजन सोहळा संपन्न

**राहुरी । प्रतिनिधी**

अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्थेच्या वतीने महाकुंभ अमृत कलश दर्शन व पूजन सोहळ्याचे आयोजन धानोरे घाट येथील आंबिका माता मंदिरात करण्यात आले.

गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज आणि रामगिरी महाराज यांनी महाकुंभ अमृत कलश पूजन करण्याचे आवाहन केले. या निमित्ताने सात्रळ येथील पुरोहित अभिजित कुलकर्णी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली धानोरे पंचक्रोशीतील ११ जोडप्यांच्या हस्ते कलश पूजन व पाणीपूजन करण्यात आले.अनुलोम संस्थेचे भागजनसेवक पृथ्वीराज तांबे यांनी अनुलोमच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले. हा सोहळा प्रवरा नदीच्या तीरावरील पुरातन धनेश्वर मंदिर आणि आंबिका माता मंदिरात संपन्न झाला.

या पूजन सोहळ्यास पद्मश्री वि. वि. पा. सह. साखर कारखान्याचे संचालक किरण दिघे,



अप्पासाहेब राधु दिघे, रंगनाथ भास्कर शिंदे, उपसरपंच ज्ञानेश्वर संतू दिघे, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर अप्पासाहेब दिघे, राहुल संपत दिघे, राहुल चांगदेव दिघे, डॉ. प्रदीप दिघे, निवृत्ती शिंदे, बाजीरावनाना दिघे, प्रा. दिघे , बाळकृष्ण चोरमुगे, वसंतराव डुक्रे, योगेश गिते, अमोल नालकर, सुभाष सर्जेराव दिघे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवानिवृत्त वन अधिकारी संजय मोरे यांचा सत्कार सोहळा संपन्न



**धुळे (प्रतिनिधी):** येथे विभागीय वन अधिकारी संजय शिवाजी मोरे हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. या निमित्त धुळे वन भवनात त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. वनसंरक्षक श्रीमती निन्नू सोमराज यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.सत्कार सोहळ्यात वनसंरक्षक निन्नू सोमराज यांनी संजय मोरे यांच्या कार्याची प्रशंसा करत, त्यांनी वनसंवर्धनासाठी दिलेले योगदान उल्लेखनीय असल्याचे सांगितले.सत्काराला उत्तर देताना संजय मोरे यांनी जल, जीवन आणि जंगल या पवित्र क्षेत्रात प्रामाणिकपणे ३२ वर्षे सेवा करण्याची संधी मिळाली, हेच माझे भाग्य आहे. ग्रामीण भागात काम करण्याची संधी मिळाली, याचा विशेष आनंद आहे, अशी भावना व्यक्त केली.या कार्यक्रमाला उपवनसंरक्षक नितीन सिंग, वनक्षेत्रपाल राजेंद्र सदगीर, सहाय्यक वनसंरक्षक कुणाल बनकर, अधिकारी अडकिने, वनपरिक्षेत्र अधिकारी भुषण वाघ तसेच वन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय योजनेच्या लाभासाठी कुणी अडवणूक करत असेल, तक्रार करा-राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

### अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी

- * शेतकरी आणि कृषी विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी
- * महिला व बालविकासासाठी भरीव मदत
- * मध्यमवर्गीयांसाठी कर सवलती
- * आयआयटी आणि एम्स संस्थांचा विस्तार
- * गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष तरतूद



**परभणी । प्रतिनिधी**

शासकीय योजनांतील घरकुल, विहिरी किंवा वैयक्तिक लाभासाठी कोणालाही एक रुपयादेखील द्यायची गरज नाही. जर कोणी पैशांची मागणी करून लाभार्थ्यांची अडवणूक करत असेल, तर त्यांनी थेट तक्रार करावी, असे आवाहन राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी पत्रकार परिषदेत केले.

शनिवारी (दि.१) झालेल्या पत्रकार परिषदेला भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर अध्यक्ष राजेश देशमुख, सुरेश भुमरे, बाळासाहेब जाधव, विलास बाबर, प्रभाकर वाघीकर, सुनील देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ५० लाख कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्प सादर केला आहे.या अर्थसंकल्पात मध्यमवर्ग, शेतकरी, महिला, युवक आणि गरीब कल्याण यांच्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. २०२४ ते २०४७ या कालावधीत भारताच्या सर्वांगीण विकासासाठी हा अर्थसंकल्प भक्कम पायाभूत सुविधा निर्माण करणारा ठरणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात परभणी जिल्ह्यासाठी भरपूर तरतूद केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, या अर्थसंकल्पामुळे भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने पुढे जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## समाजसेवक बबन शेळके यांचा नाभिक समाजाचा 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मान



**उमरखेड । प्रतिनिधी**

फूलसावगी (ता. माहागाव) येथील नामांकित समाजसेवक बबन शेळके यांना नाभिक समाजाच्या वतीने 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्यात दीर्घकाळ दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

बबन शेळके यांनी वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी अनेक उपक्रम राबवत समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी योगदान दिले आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय राहिले आहे.

पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांनी बबन शेळके यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत, त्यांच्या योगदानाची प्रशंसा केली. समाजाच्या उन्नतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान हा अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.या सन्मानामुळे नाभिक समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी बबन शेळके यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरेल, अशी भावना समाजातील विविध घटकांनी व्यक्त केली.

## धामोरी येथे 'समस्या निवारण व आभार दौरा' पार



**कोपरगाव । प्रतिनिधी**

धामोरी येथे 'समस्या निवारण व आभार दौरा' पार पडला. यावेळी गावातील प्रश्न समजून घेतले व सदर प्रश्न सोडवण्याच्या सुचना उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या तसेच गावातील उर्वरित रस्त्यांसह इतर कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

यावेळी गटविकास अधिकारी संदीप दळवी, नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, पुरवठा अधिकारी अमोल फोफसे, तालुका कृषी अधिकारी सचिन कोष्टी, महावितरणच्या सहाय्यक अभियंता रंजना करसाळे, युनियन बँकेचे मॅनेजर प्रमोदजी पुरी, विस्तारअधिकारी बबनजी वाघमोडे, पंचायत समिती अभियंता अश्विन वाघ, राजेंद्र दिघे, कृषी सहाय्यक योगेशजी माळी, पशु संवर्धन अधिकारी संतोषजी मासाळ, तालुका आरोग्य सहाय्यक विरेंद्रजी वाकचौरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुषमा सांजेकर, मंडलाधिकारी जफारजी पठाण, तलाठी सौरभ धुमाने, कालवा निरीक्षक सोमनाथ गांगुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पारनेरचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी; पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिले कार्यवाहीचे आश्वासन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील एसटी महामंडळ डेपोसाठी नवीन बस उपलब्ध करून द्याव्यात तसेच वडगाव सावताळ आणि वासुंदे गावांचा वीज प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी नवीन वीज उपकेंद्र सुरू करावे, अशी मागणी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

पारनेर एसटी डेपोमध्ये पूर्वी ६५ बसगाड्या कार्यरत होत्या, मात्र आता त्यांची संख्या ४५ वर आली आहे. यातील ९ ते १० बसेस ३१ मार्चनंतर सेवेतून बाद होणार असल्याने, डेपोला २५ नवीन बसगाड्या देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. नियमित गाड्यांच्या वेळेत बदल झाल्याने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. त्यामुळे विभाग नियंत्रक, रा. प. म. महामंडळ, अहमदनगर यांना आवश्यक निर्देश देऊन लवकरात लवकर नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्यात, असे झावरे यांनी स्पष्ट केले.तसेच, वडगाव सावताळ आणि वासुंदे ही गावे भौगोलिकदृष्ट्या मोठी असून, तेथे वारंवार वीजपुरवठा खंडित होतो. ही गावे मध्यवर्ती ठिकाणी असल्याने येथे नवीन वीज उपकेंद्र मंजूर झाल्यास परिसरातील अनेक गावांचा विजेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, अशी मागणी त्यांनी ऊर्जा विभागाकडे केली.पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या मागण्यांसंदर्भात सकारात्मक भूमिका घेत उचित कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.



## रायगड रोप-वे सेवा तांत्रिक देखभाल व दुरुस्तीसाठी पाच दिवस बंद

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड किल्ल्यावर जाण्यासाठी वापरण्यात येणारी रोप-वे सेवा तांत्रिक देखभाल आणि दुरुस्तीसाठी ३ ते ७ मार्च या कालावधीत बंद राहणार आहे, अशी माहिती रोप-वे व्यवस्थापनाने दिली आहे. त्यामुळे या कालावधीत गडावर येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

रायगड किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी लाखो पर्यटक येथे येतात. गडावर काही मिनिटांत पोहोचता यावे म्हणून रोप-वे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, प्रत्येक वर्षी उन्हाळ्याच्या सुरुवातीला या सेवेसाठी देखभाल व दुरुस्तीचे काम केले जाते. या कालावधीत तांत्रिक तपासण्या आणि आवश्यक दुरुस्त्या करण्यात येणार आहेत.३ ते ७ मार्च या पाच दिवसांमध्ये रोप-वे सेवा पूर्णतः बंद राहणार असल्याने, पर्यटकांनी गडावर जाण्यासाठी पर्यायी पायरी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन रायगड रोप-वे कंपनीचे व्यवस्थापक राजेंद्र खातू यांनी केले आहे.

# मंत्री गोगावले यांच्या शुभहस्ते टोळ बुद्रुक मोहल्ला तलाव सुशोभीकरणाचे भूमिपूजन

## काँग्रेसी विचारधरेला सोडचिठ्ठी देत बहुसंख्य मुस्लिम बंधू-भगिनींचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## खाडीपट्ट्यातील उर्वरित गावांची पाणीपट्टी माफ करण्याचे मंत्री गोगावले यांचे आश्वासन

**महाड । नितेश लोखंडे**

एमआयडीसीच्या रासायनिक जलप्रदूषणामुळे बाधित असलेल्या १३ गावांना ज्याप्रमाणे शासनातर्फे ९०% पाणीपट्टी माफ केली जाते त्याच धर्तीवर खाडीपट्ट्यातील पलीकडच्या तीरावरील उर्वरित गावांची पाणीपट्टी देखील माफ करण्यासाठी येत्या अधिवेशनातून प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास खात्याचे राज्याचे कॅबिनेटमंत्री भरतशेठ गोगावले यांनी महाड तालुक्यातील टोळ बुद्रुक येथील विकासकामाच्या भूमिपूजन सोहळ्यानिमित्ताने आले असताना उपस्थित ग्रामस्थांना दिले आहे.शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवसेना वहुर पंचायत समिती गण तर्फे महाड तालुक्यातील टोळ बुद्रुक मोहल्ला येथे तलाव सुशोभीकरण कामाच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मंत्री गोगावले दाखल होताच ग्रामस्थांच्या वतीने खालुबाजा,फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करीत त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी गोगावले यांनी ग्रामदेवता श्री टोळजाई मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला गोगावले यांच्यासमवेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुरेश महाडिक, माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र सावंत, उद्योजक सिताराम उभारे, कृष्णा सुकूम, दिलीप उकिरडे, राहुल कदम, वहूर सरपंच बिना पारधी, सौ शितल खराळे, एकनाथ सुकूम, समीर वजगरे, नरेश पिंगळे,राजू सकपाळ, अहमद माटवणकर, इत्यादी पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. गोगावले यांच्या माध्यमातून या तलाव सुशोभीकरणासाठी जवळपास ३ कोटी ६८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याने विभागातील ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे. त्याचप्रमाणे खाडीपट्ट्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या



गंभीर प्रश्नावर मात करण्यासाठी जलजीवन मिशनची आणलेली १२ कोटींची योजना, ४.५ कोटी खर्च करून केलेले मुख्य महामार्गाचे काम यासह गोगावले यांच्या माध्यमातून खाडीपट्ट्यात सुरू असलेल्या इतर अन्य विकासकामांचा धडाका पाहून त्यांच्या या विकासात्मक कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून गेली अनेक वर्ष काँग्रेसी विचारधारा मानणाऱ्या टोळ बुद्रुक येथील बहुसंख्य मुस्लिम बंधू-भगिनीनी याप्रसंगी मंत्री गोगावलेंच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यामध्ये उद्योजक जुनैद जलाल यांसह अदनान जलाल, इमदाद जलाल, इनायत उभारे, रईस वारेकर,रजाक मापकर, जलील परकार, इत्यादी अनेक मुस्लिम भगिनींचा देखील समावेश होता. या मुस्लिम भगिनींच्या वतीने मंत्री गोगावले यांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. मी जातपात मानत नसून फक्त माणूस म्हणून प्रत्येकाला मदत करीत असतो आणि आपल्या कार्यकाळात एकही हिंदू मुस्लिम तणाव आपण निर्माण होऊ दिला नाही आणि यापुढेही होणार नाही अशी खात्री गोगावले यांनी यावेळी उपस्थित मुस्लिम बांधवांना दिली आणि सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षांमध्ये मनःपूर्वक स्वागत केले. या विभागातील माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र सावंत व माजी उपसभापती शुएब पाचकर यांच्या सततच्या पाठपुरवठ्यामुळे खाडीपट्ट्यातील अनेक वर्षापासूनचे प्रलंबित प्रश्न व विकासकामे मार्गी लागण्यास सुरुवात झाल्याबद्दल भागातील ग्रामस्थांकडून त्यांना धन्यवाद देण्यात येत असून सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.या कार्यक्रमाला खाडीपट्टा विभागातील शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथरी तालुक्यात जे.ई. लसीकरण मोहिमेस प्रारंभ

**पाथरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी इंटरनॅशनल शाळा, माळीवाडा येथे 'जापानीज एन्सेफलायटीस' (जे. ई.) लसीकरण मोहीम व राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन झाले.

जापानीज एन्सेफलायटीस हा विषाणूजन्य आजार असून, डुक्कर, कुत्रे तसेच बदक, बगळे यांसारख्या पाणथळ भागातील पक्ष्यांमध्ये आढळतो. बाधित प्राण्यांना चावल्यानंतर क्युलेक्स डासाच्या मार्फत हा विषाणू लहान मुलांमध्ये पसरतो, ज्यामुळे मेंदूज्वर होण्याचा धोका असतो. हा आजार प्रामुख्याने १५ वर्षाखालील मुलांमध्ये आढळतो आणि यावर कोणतेही औषध उपलब्ध नाही. मात्र, लसीकरणाद्वारे प्रभावीपणे प्रतिबंध केला जाऊ शकतो. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने मार्च महिन्यात १ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांचे लसीकरण केले जाणार आहे. ही मोहीम तालुक्यातील सर्व शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये राबवली जाणार आहे. सर्व पात्र बालकांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले. उद्घाटन प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निखिल पुजारी, ग्रामीण रुग्णालय पाथरीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र जाधव, डॉ. रामकिशन ईक्कर, डॉ. हर्षल देशमुख, डॉ. सारिका कुलकर्णी, डॉ. फिरदोस अंसारी, डॉ. बाळासाहेब सुरवसे, बाल प्रकल्प अधिकारी गायकवाड मॅडम, गटशिक्षणाधिकारी राठोड सर यांच्यासह अटल बिहारी वाजपेयी इंटरनॅशनल शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. राजेश गिराम, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# आमदार शिवाजीराव कर्डिले जनता दरबाराच्या माध्यमातून पुन्हा सक्रिय

**राहुरी । प्रतिनिधी**

आमदार शिवाजीराव कर्डिले हे जनता दरबाराच्या माध्यमातून पुन्हा एकदा सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सक्रिय झाले आहेत. त्यांच्या जनता दरबाराच्या चर्चेने अवघ्या दोन दिवसांत मतदारसंघात उत्सुकता निर्माण केली असून, नागरिकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

मुंबई येथे पाठीच्या मणक्याच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर दीड महिन्याच्या सक्तीच्या विश्रांतीनंतर आमदार कर्डिले पुन्हा लोकांच्या सेवेत रुजू झाले आहेत. दोन दिवसांपासून बुऱ्हानगर येथील त्यांच्या निवासस्थानी सकाळी सात वाजल्यापासूनच नागरिक मोठ्या संख्येने विविध प्रश्न घेऊन येत आहेत. तरुण, वृद्ध,



महिला, शेतकरी आणि व्यापारी आपल्यासमोरील अडचणी मांडण्यासाठी मोठ्या प्रमाणात हजर राहत आहेत.

जनता दरबारामध्ये रस्ते, धरण, वीजपुरवठा, सरकारी अधिकाऱ्यांच्या कामातील विलंब, पाटपाणी, भाववाटणी यांसारख्या विषयांसह कौटुंबिक समस्या, जसे की सासरी छळ होणाऱ्या मुलींचे प्रश्नही चर्चेत येतात. विशेष म्हणजे बहुतेक सर्व प्रश्नांचे तत्काळ निराकरण होत असल्याने नागरिक समाधानाने परत जातात.

आमदार कर्डिले यांच्या सेवाभावी भूमिकेमुळे मतदारसंघातील नागरिक पुन्हा मोठ्या संख्येने त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी येत आहेत. सामान्य लोकांची सेवा हेच माझ्या जगण्याचे बळ आहे, असे सांगणारे आमदार कर्डिले जनता दरबाराच्या माध्यमातून लोकहितासाठी पुन्हा पूर्ण ताकदीने काम करत असल्याने कार्यकर्ते आणि शेतकरी आनंदित आहेत.

# २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येत असून विधिज्ञ, पक्षकार व नागरिकांनी यामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा एस.एस.भीष्म यांनी केले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूर शहर व जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येत आहे. झटपट निकाल हे लोक न्यायालयाचे वैशिष्टय आहे. लोक न्यायालयाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे यामध्ये प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा आपसी समझोत्याने व सर्वसंमतीने त्वरित समक्ष निकाल केला जातो व त्या आदेशाला दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनामएवढेच महत्व असते आणि त्याची अंमलबजावणी सुध्दा करता येते. त्याद्वारे वेळ, पैसा, श्रम यांची बचत होते, वादांचा कायमचा समोपचाराने निपटारा होतो, सर्वच पक्षांना जिंकल्याचे समाधान मिळत असल्याने भविष्यकालीन वाद टाळले जातात. या कार्यवाहीसाठी वेगळा शुल्क खर्च लागत नाही.चंद्रपूर जिल्हा मुख्यालयासह चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येत असलेल्या लोकअदालतती मध्ये न्यायालयात प्रलंबित दिवाणी, फौजदारी, कलम १३८ एन.आय. क्ट (धनादेश न वटणे) बॅकांची कर्ज वसूली वर्ग प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, जमीन अधिग्रहण अर्ज, कामगार कायद्याखालील प्रकरणे, घरमालक - भाडेकरु वाद, कौटुंबिक वाद (विवाह -विच्छेदन वगळता), इलेक्ट्रीसिटी क्टचे समझोतायोग्य वाद तसेच न्यायालयात येण्याअगोदरची (प्रि-लिटीगेशन) प्रकरणे, महसुल पाणीपट्टी वीजबिल आपसी समझोत्यायोग्य करीता ठेवून ती सामंजस्याने सोडविण्याबाबतचे आवाहन एस.एस. भीष्म यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी तसेच ज्या नागरिकांना आपली प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये ठेवायची असतील त्यांनी संबंधीत न्यायालयात किंवा जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, चंद्रपूर येथे स्वतः येऊन किंवा हेल्पलाईन फोन नंबर ०७१७२-२७१६७९ कार्यालयीन मोबाईल क्र. ८५९१९०३९३४ वर संपर्क करावा, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी कळविले आहे.

# रांजणगाव ते उज्जैन: आप्पा पवारांची २५ तासांत सायकल

**शिरूर । प्रतिनिधी**

भांबर्डे येथील आप्पा पवार यांनी २५ तासांत रांजणगाव गणपती ते उज्जैन महाकालेश्वर सायकल यात्रा पूर्ण केली.

२१ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता मळगंगा मातेचे आणि पुजारी पवार यांचे दर्शन घेऊन त्यांनी सायकल प्रवास सुरू केला. रांजणगाव गणपती मंदिरात नारळ फोडून सकाळी ७:३० वाजता त्यांनी यात्रा सुरू केली. शिरूर, सुपा, केडगाव, राहुरी, शिर्डी, मनमाडमार्गे त्यांनी प्रवास केला. मनमाड येथे बाबासाहेब पवार यांनी त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था केली.२२ फेब्रुवारी रोजी पहाटे ४:४५ वाजता उठून सकाळी ७:२० वाजता उज्जैनच्या दिशेने त्यांनी प्रवास सुरू केला. मालेगाव, धुळे,




शिरपूर, सेंधवा मार्गे रात्री १० वाजेपर्यंत २०० किलोमीटर अंतर पूर्ण करून त्यांनी महाकालेश्वराचे दर्शन घेतले.या संपूर्ण यात्रेत पहिल्या दिवशी १० तास आणि दुसऱ्या दिवशी १५ तास सायकल चालवत त्यांनी २५ तासांत प्रवास पूर्ण केला.

# महाड तालुक्यातील बिरवाडी-काळीज येथून ४० वर्षीय इसम बेपत्ता

**महाड । प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील ग्रामीण भागातून अनेक पुरुष व महिला बेपत्ता झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. काही बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध लागला असून काही जण अद्यापही बेपत्ता आहेत. अशीच एक घटना बिरवाडी काळीज येथे घडली आहे. महाड तालुक्यातील बिरवाडी - काळीज येथून एक ४० वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची तक्रार बेपत्ता व्यक्तीची आई अनिता अनंत भावेकर यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. संतोष अनंत भावेकर उर्फ बाबू असे मिसिंग झालेल्या व्यक्तीचे नाव असून दिनांक १७ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास संतोष घरातून कोणाला काहीही एक न सांगता कुठेतरी निघून गेला व तो अद्यापही घरी परत आलेला



नाही. घरच्या नातेवाईकांनी आजूबाजूला इतर नातेवाईकांकडे तपास केला मात्र संतोषचा कुठेही पत्ता न लागल्यामुळे घरच्यांनी थेट पोलीस ठाणे गाठलं आणि संतोष १३ दिवसापासून बेपत्ता असल्याची तक्रार महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. संतोष अनंत भावेकर हा बिरवाडी - काळीज येथील रहिवाशी असून त्याचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, केस काळे, अंगात पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट तसेच डाव्या हाताचे मनगटावर जखमांच्या खुणा असे वर्णन पोलिसांनी तक्रारीमध्ये नमूद केले आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक सतीश बोटे या संपूर्ण मिसिंग तक्रारीचा अधिक तपास करीत आहेत.

# भद्रावती येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानाट्य संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्याग व संघर्षाची गाथा कथन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुध्दम शरणमं गच्छामि हे महानाट्य भद्रावती येथे काल संपन्न झाले. रविवारी सायंकाळी ६ वाजता स्थानिक ऐतिहासिक विजासन बुध्दलेणी परीसरात या महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते. अभ्युदय आर्ट अकॅडमी,नलगोंडा, तेलंगणा प्रस्तुत या नाटकाचे लेखक हैदराबाद तेलंगणा येथील के.देवेंद्र असून एम जग्गाराजू हे दिग्दर्शक आहेत. महाविदर्भ भिख्खू संघ व वर्षावास आयोजन समितीच्या वतीने विंजासन परीसरातील अभ्यासिकेच्या मदतीसाठी सदर नाटकाचे आयोजन करण्यात आले.



**नाट्य कलावंतांसोबत सामाजिक कार्यकर्ते विनयबोधी डोंगरे व अन्य मान्यवर**

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी व त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या नाटकाच्या यशस्वीतेसाठी जयदेव खाडे, विनयबोधी डोंगरे, सुरज गावंडे, प्रियवंद वाघमारे, धर्माजी गायकवाड, कवडू कांबळे, बी.डी. देशपांडे, लिनता जुनघरे, छाया कांबळे, शिला खाडे, शालिनी गोडघाटे, नंदा रामटेके यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्न केले.

# राज्यस्तरीय विज्ञान रंजन स्पर्धेत तनुश्री अहिरकर प्रथम

**वरोरा । प्रतिनिधी**

मराठी विज्ञान परिषद, पुणे विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान रंजन स्पर्धेची अंतिम प्रयोग फेरी सायन्स पार्क, पिंपरी-चिंचवड येथे पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून ६२७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातील ५४ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. यंदाच्या स्पर्धेत वरोरा येथील लोक शिक्षण संस्थेच्या तीन विद्यार्थिनींची अंतिम फेरीत निवड झाली होती. त्यामध्ये तनुश्री अहिरकर हिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावण्याचा बहुमान मिळवला. या विजयाबद्दल तिला ५००० रोख, भेटवस्तू, पुस्तक आणि प्रमाणपत्र देऊन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.मिलिंद वाटवे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच, श्रुती पाटेकर हिने उत्तेजनार्थ सहावा क्रमांक मिळवला असून तिला ५०० रोख, पुस्तक आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. श्रुती द्विवेदी हिला उत्तेजनार्थ सत्कार म्हणून पुस्तक आणि प्रमाणपत्र देण्यात आले.या विद्यार्थिनींना लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पाटील, लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल राखे आणि संस्थेचे माजी विद्यार्थी कार्तिक तडसे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थिनींनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीने संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# महामिनरल मायनिंग कंपनीने स्थानिकांच्या मागण्या तात्काळ सोडवाव्यात–आमदार किशोर जोरगेवार

## गावकऱ्यांमध्ये रोष, शिष्टमंडळाने भेट घेऊन दिले निवेदन

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

उसगाव लगतच्या महामिनरल मायनिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कार्यप्रणाली मुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. कंपनीच्या कामकाजामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले असून, त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्याच्या सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी कंपनी व्यवस्थापनाला दिल्या आहेत.

भारतीय जनता पक्षाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या शिष्टमंडळाने आणि गावकऱ्यांनी कंपनी व्यवस्थापनाची भेट घेतली असून, आमदार किशोर जोरगेवार यांचे निवेदन कंपनी व्यवस्थापनाला दिले आहे. यावेळी उसगाव ग्रामपंचायत सरपंच निविता ठाकरे, उपसरपंच मंगेश आसुरकर, सदस्य यमुना राजुरकर, रेखा कोडापे, वर्षा बोंदरे, धनंजय ठाकरे, रमेश काळे, कवडू ठोबरे, मोहनदास राजुरकर, दिलीप ठाकरे, उसगाव पोलिस पाटील नरेंद्र बुच्चे, इमरान खान, संजय तिवारी, निरिक्षण तांडा, संतोष नुने, मिन्टु कलवल, पसी गादे, विशाल अड्डूर, इमरान खान, स्वप्निल वाढई, नंदकिशोर यादव, विजय कपूर, सागर रामटेके, रमन तांडा, महेश लठ्ठा, मयुर कलवल, राहुल चुपाका, सागर गेडाम, उदय कलवल, अरुण दाभेरे, हेमराज बोबडे, यांची उपस्थिती होती.कंपनीच्या जड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. हे रस्ते गावकऱ्यांच्या दैनंदिन रहदारीसाठी असून, कंपनीने त्वरित त्यांची डागडुजी करावी तसेच अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्ग तयार



करावा. कंपनीतून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे आणि कोळसा वॉशरीजमधून होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. लहान मुले, वृद्ध आणि इतर रहिवाशांना श्वसनासंबंधी आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात. कंपनीच्या प्रदूषणामुळे गावांमधील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. म्हणून, कंपनीने आपल्या सामाजिक दायित्व निधीअंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करावीत. त्याचप्रमाणे, या निधीच्या माध्यमातून गावातील मूलभूत सुविधा आणि विकासकामांवर भर द्यावा. ग्रामपंचायतीकडे प्रलंबित असलेला कर तातडीने भरावा, अशा सूचनाही निवेदनाच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी दिल्या आहेत.कंपनीतून निघणाऱ्या धुरामुळे परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, शेतकऱ्यांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा तसेच नुकसानभरपाई वाढवावी, अशी मागणीही गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती. तसेच गावकऱ्यांच्या वतीने स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार करण्यात आली आहे. मात्र, अद्याप यावर कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. त्यामुळे स्थानिकांना प्राथमिकता देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचेही आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. यावर येत्या १० दिवसांत निर्णय घेण्यात येणार असल्याचे आश्वासन कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने शिष्टमंडळाला देण्यात आले आहे.

# आदिनाथ कारखान्याच्या मळी विक्रीत ३२ लाखांचा भ्रष्टाचार?

## शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचा गंभीर आरोप

### आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी खुलासा द्यावा–मागणी

**मळी महसूल प्रशासनाने जप्त करून विक्री केली. लिलाव प्रक्रिया महसूल विभागाने पार पाडली असून, या व्यवहारा बाबत मला अधिक माहिती नाही.**

**कार्यकारी संचालक**
**अरुण बगणवार**

**मळी जप्त करून शेतकऱ्यांच्या देणीसाठी विक्रीस काढण्यात आली होती. या व्यवहारातील दर, विक्री झालेली मळीची गुणवत्ता याबाबत कार्यकारी संचालक अधिक माहिती देऊ शकतात. मात्र,तक्रारीनंतर या व्यवहाराची चौकशी करण्यात येईल.**
**–तहसीलदार शिल्पाताई ठोकडे**

**सोलापूर । प्रतिनिधी**

आदिनाथ सहकारी साखर कारखाना आर्थिक अडचणीत असतानाही मळी विक्रीत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केला आहे. सुमारे १००० मेट्रिक टन मळी प्रतिटन ८,५०० रुपयांना विकण्यात आली, मात्र सध्याचा बाजारभाव १३,००० रुपये प्रतिटन असल्याने या व्यवहारात तब्बल ३२ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

मागील गळीत हंगामात आदिनाथ कारखान्यातील साखर बाहेर गेली नसल्याने, कारखान्यात साठवलेली मळी उच्च प्रतीची तयार झाली होती. त्या वेळी कामगारांनी ही मळी विक्रीस विरोध केला होता. मात्र, यंदा महसूल प्रशासनाने मळी जप्त करून विक्रीस काढली, आणि कार्यकारी संचालक



अरुण बगणवार यांच्या उपस्थितीत हा व्यवहार पार पडला.मळीच्या विक्रीत टँकर वजनातही फेरफार झाल्याचा आरोप महेश चिवटे यांनी केला आहे. उत्पादन विभागाच्या अहवालानुसार १५०० ते १६०० मेट्रिक टन मळी निर्मिती झाली होती, मात्र प्रत्यक्षात किती विकली गेली व पैसे किती जमा झाले, याची स्पष्टता प्रशासनाने केलेली नाही, असेही त्यांनी सांगितले.

### आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी भूमिका स्पष्ट करावी–चिवटे

**आदिनाथ कारखान्याच्या संचालक मंडळात बदल करून आपल्या समर्थकांची नियुक्ती आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केल्याचा आरोप महेश चिवटे यांनी केला आहे. त्यामुळे या मळी व्यवहारात नेमके काय घडले, हे त्यांनी सभासदांसमोर स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.**

### निवडणुकीपूर्वी शेवटचा 'हात साफ' केला?

**दरम्यान, आदिनाथ कारखान्याची निवडणूक अवघ्या दोन दिवसांत जाहीर होणार आहे. त्याआधीच झालेल्या या व्यवहारामुळे शेवटचा हात साफ करण्याचा प्रयत्न झाला काय? अशी चर्चा करमाळा तालुक्यात सुरू आहे.**

# जव्हार शहरात महाराष्ट्र भूषण तिर्थ डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान

**जव्हार । प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण तिर्थ. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या वतीने जव्हार शहरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. मुख्य रस्ते आणि शासकीय कार्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेत विक्रमगड विधानसभा आमदार हरिश्चंद्र भोये यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि प्रत्यक्ष स्वच्छता करून सहभाग नोंदवला. स्वच्छता मोहिमेत ४३३ श्री सदस्यांनी सकाळी ७ ते ११:३० या वेळेत जव्हार शहरातील ७५०० चौ. मी. क्षेत्रफळाची स्वच्छता केली. स्वच्छता मोहिमेसाठी ४ ट्रॅक्टर, ३ कचऱ्याच्या गाड्या, २६४ झाडू, २ घमेली, ६९ कोयते, ५३ पंजा,



१५ फावडे, १२ विळ्या, ५०० मास्क, ५१० जोडी हँडग्लोज यांचा वापर करण्यात आला. १३.५०० टन सुका कचरा संकलन व विल्हेवाट लावण्यात आली, तर ७.२०० टन ओल्या कचऱ्यासाठी ३३ ट्रॅक्टर फेऱ्या करण्यात आल्या. नगर परिषद जव्हारच्या सहकार्याने ही स्वच्छता मोहीम यशस्वीपणे पार पडली.

# श्रीमती सावित्रीबाई लक्ष्मणराव बन्नगरे यांचे दु:खद निधन

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील न्यू कुर्ला निवासी व सामाजिक, राजकीय कार्यकर्ते दिलीप बन्नगरे यांच्या मातोश्री श्रीमती सावित्रीबाई लक्ष्मणराव बन्नगरे (वय ८९) यांचे आज दि. २ मार्चला पहाटे ५-१५ ला दुःखद निधन झाले.त्यांच्यामागे मुलगा, सुना , नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. स्थानिय पंचधारा त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# महाशिवरात्री महोत्सवात कॉमेडी कलाकारांची तुफान फटकेबाजी

**नागभीड । प्रतिनिधी**

महाशिवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने नागभीड येथे आयोजित स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये प्रसिद्ध विनोदी कलाकारांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. एहसान कुरेशी, विजय पवार, सुनील पाल, गौरव मोरे, वनिता खरात आणि पुष्पा फेम अभिनेता अजय मोहिते यांनी हास्याची मेजवानी दिली.

नागभीड महाशिवरात्री महोत्सव समितीच्या वतीने २६ फेब्रुवारी ते ६ मार्चदरम्यान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यात्रेच्या दिवशी भाविकांसाठी साबुदाणा खिचडी वाटप, २७ फेब्रुवारी रोजी मोफत आरोग्य शिबिर, १ मार्च रोजी स्टँड-अप कॉमेडी शो तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

महाशिवरात्री महोत्सवाचे उद्घाटन आमदार बंटीभाऊ भांगडीया यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी श्रद्धेय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी शिवटेकडी लॉनच्या भूमिपूजनाचा शुभारंभही केला. यावेळी प्रमुख अतिथी



म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजन जयस्वाल, भाजप नेते वसंत वारजूरकर, माजी जि.प. उपाध्यक्ष कृष्णा सहारे, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनकरठोसरे व राकेश जाधव, माजी प्राचार्य डॉ. अमीर धमानी, जि.प. माजी सदस्य संजय गजपुरे, प्रा. डॉ. उमाजी हीरे, नागभीड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्याम पाथोडे, भारत सरकार नोटरी ड. रविंद्र चौधरी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात शिवटेकडी येथील प्रसिद्ध मूर्तिकार देवा रंगारी (राजनांदगाव) यांचा त्रिशूल व श्रीफळ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. नागभीड तालुक्यातील पत्रकार बांधवांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महाशिवरात्री महोत्सव समितीच्या वतीने आमदार बंटीभाऊ भांगडीया यांचा पेशवेकालीन पगडी, शेला, त्रिशूल व भव्य हाराने स्वागत करण्यात आले. महिला कार्यकारिणीने समई भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पराग भानारकर यांनी, प्रास्ताविक गणेश तर्वेकर यांनी, तर आभार संतोष रडके यांनी मानले. दि. ३ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय गायिका गीता बेन रबारी यांच्या लाईव्ह म्युझिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# करमाळा उपजिल्हा रुग्णालयाची नवीन इमारत लवकरच कार्यान्वित

**करमाळा । प्रतिनिधी**

करमाळा उपजिल्हा रुग्णालयाची नवीन इमारत आणि अधिकारी-कर्मचारी वसाहतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, लवकरच ही सुविधा रुग्णांच्या सेवेत दाखल होणार आहे. माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी या कामाची पाहणी केली.

२०१९-२४ या कार्यकाळात माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी ४३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता. यामध्ये



नवीन उपजिल्हा रुग्णालय आणि वसाहतीच्या बांधकामाचा समावेश आहे.

ही इमारत तळमजला आणि दोन मजली असून, एकूण ७३२०.२१ चौ. मी. क्षेत्रफळाची आहे. यात तपासणी केंद्र, विलगीकरण कक्ष, ऑपरेशन थिएटर, आयसीयू, डायालिसिस सेंटर, पुरुष आणि महिला वॉर्ड तसेच वैद्यकीय अधीक्षक कार्यालय यांचा समावेश आहे.

या कामावर आतापर्यंत १७.३३ कोटी रुपये खर्च झाले असून, सध्या दरवाजे, खिडक्या आणि रंगकाम बाकी आहे. हे काम पूर्ण होताच इमारत रुग्णांच्या सेवेत दाखल होणार आहे.

# डॉ.के.पी.गारोळे शिक्षण केंद्र गंगाखेड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा संपन्न

**गंगाखेड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त डॉ. के. पी. गारोळे शिक्षण केंद्र, गंगाखेड येथे तालुका स्तरावरील स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली. या परीक्षेत इयत्ता सहावी ते नववीच्या मराठी व इतर माध्यमांच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.स्पर्धा परीक्षेचे स्वरूप ७२० गुणांसाठी निश्चित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांवर आधारित प्रश्न विचारण्यात आले.कार्यक्रमास संस्थेचे संचालक डॉ. किशन गारोळे आणि गारोळे उपस्थित होते.



# डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे वासिंद येथे स्वच्छता अभियान संपन्न

**वासिंद । प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने वासिंद येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या मोहिमेत शहरातील २० किलोमीटर रस्त्यांच्या दुतर्फा स्वच्छता करून ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला.या अभियानात एकूण १०८६ श्री सदस्यांनी सहभाग घेतला. चक्रधारी हॉटेल ते साईनाथ नगर, पाटिल चौक, रेल्वे अंडर ब्रिज, हनुमान कॉलनी, जिजामाता रोड, गडे दुकान, गणेश घाट, स्मशानभूमी आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. ३९०६ किलो ओला व ७८८५ किलो सुका कचरा संकलित करून कासणे येथील डम्पिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावण्यात आली.

या वेळी वासिंदचे सरपंच राजेंद्र म्हसकर, सदस्य विलास पाटील, राजू भेरे, सुधीर बेलवले, वासुदेव काठोले, संदीप पाटील, शरद दिवाणे (सरपंच गेरसे) तसेच पत्रकार संजय भालेराव आणि काळुराम भोईर उपस्थित होते. स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्याचे कार्य प्रतिष्ठानतर्फे सातत्याने करण्यात येत आहे. वासिंद परिसरातून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.



# तीर्थक्षेत्र संगोबा येथे आदिनाथ महाराज मंदिरात सीसीटीव्ही बसवण्याची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र संगोबा (ता. करमाळा) येथील आदिनाथ महाराज मंदिराच्या सुरक्षेसाठी मंदिर व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशी मागणी घारगावच्या माजी सरपंच लक्ष्मी संजय सरवदे यांनी केली आहे.

संगोबा हे गाव अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर सीना नदीच्या काठावर वसलेले असून, येथे दरवर्षी महाशिवरात्रीला दोन दिवसांची यात्रा भरते. तीनही जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येतात.प्रत्येक महिन्याच्या एकादशीला देखील येथे भक्त मोठ्या संख्येने येत असतात, त्यामुळे मंदिराच्या पावित्र्याच्या दृष्टीने आणि सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवण्याची आवश्यकता आहे, असे सरवदे यांनी सांगितले.

त्या पोथरे गट ग्रामपंचायतीकडे लवकरच या मागणीसाठी निवेदन देणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .